**MHKO100011072022**

## संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७१/२०२२ निशाणी क्र.४५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज फिर्यादी यांनी फिर्यादीमध्ये दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, फिर्यादी कंपनीचे "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी लिमिटेड" असे पुर्वीचे नाव असून कंपनी नोंदणी कार्यालय दिल्ली यांचे आदेशानुसार फिर्यादी कंपनी "श्रीराम फायनान्स लिमिटेड" यामध्ये अंतर्भाव केला आहे. तरी फिर्यादच्या टायटल क्लॉजमध्ये "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी लिमिटेड" या नावास काट मारून "श्रीराम फायनान्स लिमिटेड" अशी करणे आवश्यक आहे. तसेच "दिनांक ३०/११/२०२२ इ. रोजीच्या कंपनी नोंदणी कार्यालय दिल्ली यांचे आदेशानुसार फिर्यादी कंपनीचा अंतर्भाव श्रीराम फायनान्स लिमिटेड या कंपनीमध्ये रितसर झालेला असून त्याची जाहीर नोटीस भारतातील अग्रगण्य वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. तसेच प्रस्तुतची फिर्याद पुढे चालविण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार श्री. सुनिल शंकर पाटील यांना दिनांक ०६/०६/२०१३ इ रोजीचे नोटरी रजि.क्र.३२७६ नुसार देण्यात आलेले आहेत"हा मजकूर समाविष्ट करण्याची परवानगी मागितली आहे. सदरची दुरूस्ती ही तांत्रीक व अनुषंगित स्वरूपाची असल्याने ती मंजूर करण्यात यावी.

२. आरोपी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, फिर्यादीचा अर्ज हा कंपनीज ॲक्टच्या तरतुदीअंतर्गत येत नसल्यामुळे व फिर्यादी यांनी अर्जासोबत अर्जात नमूद केलेल्या कारणांना पुष्टी देण्याकरीता कोणताही दस्तऐवज जोडून दिलेला नाही. अर्ज मंजूर केल्यास फिर्यादीमध्ये नमूद केलेल्या फिर्यादीचे कारण बदलणार आहे. आरोपी यांनी तथाकथित धनादेश फिर्यादी कंपनीला

अगर मुळ फिर्यादीला कधीही दिलेला नव्हता व नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही बाजुंचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. फिर्यादीने प्रस्तुतचा अर्ज "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी लिमिटेड” या नावास काट मारून "श्रीराम फायनान्स लिमिटेड” अशी दुरूस्ती करण्याकरीता दिला आहे. फिर्यादीने वर्णन यादी निशाणी ४६ चे वर्णन यादीसोबत भारत सरकार यांनी फिर्यादीस कंपनीच्या नावात बदल करण्यासंबंधी दिलेले प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता फिर्यादी कंपनीचे नाव "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी लिमिटेड” ऐवजी "श्रीराम फायनान्स लिमिटेड” असे बदलण्यात आले आहे. तसेच सदरची केस चालविणेचे अधिकार सुनिल पाटील यांना दिल्याबाबत लेटर ऑफ ऑथोरॉझेशन व सुनिल पाटील यांचे नावे असलेले पावर ऑफ ॲटर्नी दाखल केले आहे. त्या अनुषंगाने मागितलेली दुरूस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. फिर्यादी सदरची दुरूस्ती ही कंपनीचे नावात बदल झालेने मागत आहे. सदरची दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची असलेने मंजूर केलेस आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**१.** फिर्यादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** फिर्यादी यांनी फिर्यादीमध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत त्याचदिवशी अभिलेखावर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.11.11
11:11:34 +0530

ठिकाणः- गडहिंग्लज
दिनांक - १०/११/२०२५

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र. २)
गडहिंग्लज